# केंद्रीय विद्यालयात कार्यक्रम

अहमदनगर, ता. १६ : व्ही. आर. डी. ई. येथील केंद्रीय विद्यालयात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्राचार्य बाळासाहेब लोंढे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यानिमित्ताने केंद्रीय विद्यालयात देशभक्तीपर व्याख्यान, समूह नृत्य, अभिनय व गीत गायन आदी कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर केले. विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. या वेळी सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.